॥ श्री ॥
॥ बाबा ॥

शेगांवीचे स्वामी गजानन भक्ताला पावले ।
बाळकृष्ण स्वरूपी ते बाबांना दिसले ॥धृ॥

वांगणीगावी बाबांनी नामस्मरण केले
बाळकृष्णरुपात स्वामी मंदिरी वसले ॥1॥

मंदिरी येऊनी स्वामींचे घेता दर्शन ।
घेता दर्शन बाबांचे होतो पावन ॥2॥

भक्त येती बाबांपाशी मिळतो निवारा।
बाबांचा सहवास कसा गोड प्रेम धारा ॥3॥

बाळकृष्ण दूर करी भक्तांच्या व्यथा ।
बाबांच्या सामर्थ्याची ऐका ही कथा ॥4॥

दैव उदयाचे कळते सारे बाबा त्रिकाल ज्ञानी।
भक्त सारे येती सदगुरु बाबांचे चरणी ॥5॥

बाबांचा हा अगाध महिमा भक्तांच्या साठी।
बाबांना प्रणाम आमचे असती कोटी कोटी ॥6॥

★★★★★